**राज्यातील रहिवाशांना केंद्र पुरस्कृत आधार प्रकल्पा अंतर्गत एकमेव ओळख क्रमांक (UID) देण्याबाबतची अंमलबजावणी**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
मातंसं-२०१०/प्र.क्र. ७१/का-३९
दिनांक :- ९ -९-२०१०.

**वाचा :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र. मातंसं/२०१०/प्र.क्र.४८/३९, दि. ३.४.२०१०.

**प्रस्तावना :**

केंद्र सरकारने नियोजन आयोगाच्या अधिपत्याखाली भारतातील रहिवाशांना ओळख क्रमांक देण्यासाठी युनिक आयडेंटिटी ॲथॉरिटी ऑफ इंडिया या प्राधिकरणाची स्थापना केली आहे. भारतातील रहिवाशांना ओळख क्रमांक देण्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक व विधिविषयक पायाभूत सोयी सुविधा निर्माण करणे व त्याची अंमलबजावणी करणे हे या प्राधिकरणाचे प्रमुख काम आहे. प्रत्येक रहिवाशाला ओळख क्रमांक दिल्यास त्याची पडताळणी ऑनलाईन यंत्रणेव्दारे कमी खर्चामध्ये करता येणार असून प्रत्येक क्षेत्रातील बनावट प्रकरणांचे प्रमाण लक्षणियरित्या कमी होणार आहे.

२. महाराष्ट्र शासनाने राज्यामध्ये 'आधार' प्रकल्प राबविण्याकरिता युनिक आयडेंटिटी ॲथॉरिटी ऑफ इंडिया या प्राधिकरणासोबत दि. १० मे, २०१० रोजी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केलेली आहे.

३. 'आधार' प्रकल्पाच्या राज्यातील प्रभावी अंमलबजावणीकरिता मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्रमांक मातंसं/२०१०/प्र.क्र.४८/३९, दि. ३ एप्रिल २०१० अन्वये मंत्रिमंडळ उच्चाधिकार उप समिती स्थापन करण्यांत आली आहे. याबरोबरच प्रकल्पावर देखरेख व संनियंत्रण करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती दि. ३ एप्रिल २०१० च्या शासन निर्णया अन्वये स्थापन करण्यात आलेली आहे.

४. राज्यातील दारिद्रयरेषेखालील व्यक्ति 'आधार'प्रकल्पा अंतर्गत नोंदणीपासून वंचित राहु नये यासाठी त्यांना प्रतीव्यक्ति रु. १००/- देण्याचे केंद्र शासनाने जाहिर केलेले आहे. याकरिता रु. ३१.७ कोटी राज्यशासनास पहिला हप्ता म्हणुन वितरित केले आहे. या व्यतिरिक्त केंद्र शासन मार्च २०११ पर्यंत पहिल्या १० कोटी नोंदणीसाठी प्रत्येक नोंदणीमागे राज्य शासनाला रु. ५०/- देणार आहे. त्यानंतरचा खर्च मात्र राज्य शासनाला करावा लागणार आहे.

५. राज्यातील रहिवाशांना एकमेव ओळख क्रमांक (युनिक आयडेंटीटी क्रमांक) देण्याच्या 'आधार' कार्यक्रमाच्या अनुषंगाने शासनातील विविध विभागांचा सहभाग तसेच अंमलबजावणीबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णयः-**

१) रहिवाशांना ओळख क्रमांक देण्याच्या हेतुने आधार प्रकल्पाची अंमजबजावणी युध्द पातळीवर करण्यात यावी. जेणेकरुन राज्यामध्ये हा प्रकल्प विहित मुदतीत पुर्ण झाल्यास केंद्र शासनाकडुन जास्तीत जास्त आर्थिक मदत प्राप्त करता येईल. याकरिता खालील प्रमाणे वेळापत्रकाचे पालन करण्यात यावे:-

(Release of Request for Quotation)

(ii) प्रकल्पासाठी काम करणाऱ्या संस्थेची निवड (Enrollment Agencies) -- सप्टेंबर, २०१० अखेर पर्यंत

(iii) निवड केलेल्या संस्थेचे प्रशिक्षण तसेच प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या साहित्याचे दर्जा नियंत्रण (Quality Control) -- ऑक्टोबर, २०१० अखेर पर्यंत

(iv) रहिवाशांना ओळख क्रमांक देण्याच्या हेतुने माहिती संकलनाची सुरुवात -- १ नोव्हेंबर २०१० ते २८ फेब्रुवारी ११

२) राज्यस्तरावर माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन हा समन्वय विभाग म्हणुन कार्य करेल.

या प्रकल्पाची अंमलबजावणी तसेच संनियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्याच्या कार्यमुल्यांकन अहवालामध्ये 'आधार' प्रकल्प कामकाज, अंमलबजावणी इत्यादिंची नोंद घेण्यात यावी. सचिव (माहिती तंत्रज्ञान) हे समन्वय अधिकारी म्हणुन काम पहातील. प्रकल्पाची अंमलबजावणी महसुल व नगर विकास विभागांमार्फत करण्यात यावी. प्रकल्पाचा आढावा घेण्याकरिता आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्त (महसूल), जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त इत्यादींना बैठकीसाठी बोलविण्याचे अधिकार सचिव (मातं) यांना राहतील.

३ ) राज्यातील ग्रामीण भागाकरीता जिल्हाधिकारी हे निबंधक व तहसिलदार हे उपनिबंधक म्हणुन काम पहातील. तसेच नगर परिषद कार्यक्षेत्रामध्ये मुख्याधिकारी नगरपरिषद हे उपनिबंधक म्हणुन जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली कार्य करतील. नागरी भागाकरीता महापालिका आयुक्त हे निबंधक व प्रभाग अधिकारी (वॉर्ड ऑफीसर) हे उपनिबंधक असतील. विभागीय आयुक्त हे परिवेक्षीय अधिकारी म्हणुन निबंधकाच्या कामकाजाचा आढावा घेतील. विहित कालमर्यादेत अंमलबजावणीबाबत दिलेले उद्दिष्ट पुर्ण करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी तसेच महापालिका आयुक्त यांचेवर सोपविण्यात येत आहे.

४) अतिरिक्त मुख्य सचिव (महसुल), सचिव (नगर विकास) व विभागीय महसुल आयुक्त हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रकल्प अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेतील. मुख्यसचिव हे राज्यस्तरावरील देखरेख समितीमार्फत अंमलबजावणीचा आढावा घेतील.

५) मंत्रालयीन विभागांच्या सचिवांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना निबंधक यांना सहकार्य करण्याचे आदेश दयावेत.

**माहिती तंत्रज्ञान संचालनालय (सा.प्र.वि.) या समन्वयक विभागाने 'आधार' प्रकल्पाच्या अनुषंगाने नोंदणीबाबत करावयाची कार्यवाही.**

i) केंद्र शासनाने आधार प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्याकरिता निवड केलेल्या संस्थांकडुन दरपत्रक (Request for Quote) मागविणे

ii) केंद्र शासनाने राज्याकरिता निवड केलेल्या ७७ (Empannelled) संस्थांपैकी ४२ संस्थांची वर्गवारी F4 अशा आर्थिकदृष्टया सक्षम गटामध्ये केलेली आहे. अशा ४२ संस्थांकडुन वाणिज्यिक निविदा मागविणे.

iii ) प्रत्येक जिल्हयातील नोंदणी संकलनाकरिता ३ संस्थांची निविदा पध्दतीद्वारे निवड करणे, तथापि ज्या जिल्हयांची लोकसंख्या जास्त आहे अशा जिल्हयांकरिता अतिरिक्त २ ते ३ संस्थांची निवड करणे.

iv) प्रत्येक जिल्हयात अतिरिक्त संस्था म्हणुन महा-ऑन लाईन प्रा.लि. (टिसीएस सोबत शासनाने स्थापन केलेली संयुक्त भागिदारी संस्था) ही संस्था वरील निविदेद्वारे निवडलेल्या न्युनत्तम दरानुसार काम करेल.

v) जिल्हयांकरिता निवड केलेल्या संस्थांचे काम असमाधानकारक असल्यास जिल्हाधिकारी हे सदर काम जिल्हयातील इतर संस्थांकडे सोपवु शकतील.

vi) राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, तहसिल, जिल्हा परिषद, पंचायत समिती इत्यादी कार्यालयांना 'आधार' प्रकल्पाच्या प्रसिध्दीसाठीचे मराठी भाषेतील सादरीकरण माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत पुरविण्यात यावे.

vii) राज्यातील 'आधार' प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता केंद्र शासनाकडुन प्राप्त होणारा निधी हा राज्यस्तरिय सेतु सोसायटीच्या खात्यामध्ये ठेवण्यात यावा व आवश्यकतेनुसार जिल्हास्तरीय सेतु सोसायटी, महानगर पालिका यांना सदर निधी वितरित करण्यात यावा. महानगर पालिकेने याकामाकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष उघडुन त्यामध्ये सदर निधी जमा करावा.

६) राज्यातील आधार प्रकल्पासाठी माहिती संकलन करण्याचे काम दि. १ नोव्हेंबर, २०१० पासून सुरु करण्यात येणार आहे. दि. १५ ऑक्टोबर २०१० पासून माहिती व जनसंपर्क संचालनालयाने 'आधार' प्रकल्पाची विविध माध्यमातुन व्यापक प्रसिध्दी दयावी. याबाबतचा खर्च राज्य सेतु सोसायटीमार्फत करण्यात यावा.

७) रहिवाशांच्या नोंदणीकरिता केंद्र शासनाने Know Your Resident (KYR) हा रितसर तक्ता (Format) उपलब्ध करुन दिलेला आहे. राज्यातील विविध विभागाच्या आवश्यकतेनुसार (उदा. अन्न व नागरी पुरवठा, आरोग्य व कुटूंब कल्याण, शालेय शिक्षण, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, आदिवासी विकास इ.) या तक्त्यामध्ये अधिक माहिती अंतर्भूत करावयाची झाल्यास (KYR+) याबाबतचे अधिकार मा.मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखालील देखरेख व संनियंत्रण समितीस असतील.

८) 'आधार' प्रकल्पाच्या अंतर्गत नोंदणी करताना ज्या नागरीकांकडे ओळखपत्र अथवा वास्तव्याचा दाखला नसेल अशा नागरीकांसाठी संबंधित कार्यक्षेत्रातील निबंधक यांनी नियुक्त केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांकडुन ओळखपत्र शिफारस घेण्यात यावी. तसेच KYR आणि KYR+ तक्ता भरताना दस्तऐवजांच्या पडताळणीसाठी निबंधकांनी १००० लोकसंख्येकरीता दोन या प्रमाणात शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.

या शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आली असुन त्याचा संगणक संकेतांक २०१००९०९१९०५०१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जे. पी. डांगे )
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

मुख्यसचिव यांचे खाजगी सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,
सर्व विभागीय आयुक्त, /सर्व जिल्हाधिकारी,/ सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व आयुक्त,महानगरपालीका
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,(विधान परिषद /विधान सभा),मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई / लेखाकोष भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई
कंपनी सचिव, महा-ऑनलाईन प्रा.लि.मंत्रालय, मुंबई
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

*********